# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः04.07.2024 वारःगुरुवार

**ठळक बातम्या**

1 )मणिपूरमधील परिस्थिती निवळण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत असल्याचा पंतप्रधानांचा पुनरुच्चार

2)शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर करणार भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व

3)पुण्यात झिका विषाणूचा संसर्ग झालेला सातवा रुग्ण आढळल्यानंतर; केंद्रिय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचना जारी

4)महाराष्ट्रात, आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रं स्थापन करण्यावर निवडणूक आयोगाचा भर

आणि

5)आसाम राज्यातली पूरस्थिती गंभीर; 29 जिल्ह्यांमधील 16 लाखांहून अधिक लोक पुराच्या तडाख्यात.

**मणिपूर-राज्य**

मणिपूरमधील परिस्थिती निवळण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत असल्याचा पुनरुच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. संसदेच्या संयुक्त बैठकीतील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला राज्यसभेत उत्तर देताना पंतप्रधानांनी “मणिपूरमध्ये शांतता आणि सौहार्द सुनिश्चित करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार सर्व संबंधितांशी चर्चा करत असल्याचं अधोरेखित केलं . मणिपूरमध्ये राहून स्वतः गृहमंत्र्यांनी शांततेच्या प्रयत्नांचं नेतृत्व केलं. समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही दबाव टाकण्यात आला असं ते म्हणाले. मणिपूरमधील हिंसाचाराच्या घटना सातत्याने कमी होत असल्याचं सत्य आपण मान्य केलं पाहिजे यावर पंतप्रधानांनी भर दिला. आज मणिपूरमध्ये शाळा, महाविद्यालये, कार्यालये आणि इतर संस्था नेहमीप्रमाणे सुरू असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली. पंतप्रधान हे वक्तव्य करत असतानाच काँग्रेस, द्रमुक, टीएमसी, आम आदमी पार्टी, आरजेडी, डावे आणि इतर विरोधी पक्ष सदस्यांनी गदारोळ केला. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना आपल्या जागी जाऊन बसण्याची विनंती केली. त्यानंतर विरोधी पक्षांनी सभात्याग केला. विरोधकांच्या सभात्यागावर पंतप्रधान म्हणाले, की विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरं ऐकण्याचं धाडस विरोधकांमध्ये नाही. सभात्याग करणं हा सभागृहाचा अपमान आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत केलेल्या अभिभाषणाबद्दल सभागृहाने धन्यवाद प्रस्ताव मंजूर केल्यावर राज्यसभेचं कामकाज काल अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं .

**जयशंकर शिखर बैठक**

परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर आज कझाकस्तानमधील अस्ताना इथं शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करतील. ते SCO राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेच्या 24 व्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिनिधित्व करत आहेत. शिखर परिषदेदरम्यान, नेत्यांनी संघटनेच्या गेल्या दोन दशकांतील उपक्रमांचा आढावा घेणं आणि राज्य आणि बहुपक्षीय सहकार्याच्या शक्यतांवर चर्चा करणं अपेक्षित आहे. SCO मधील भारताच्या प्राधान्यक्रमांना पंतप्रधानांच्या ‘सिक्योर’ SCO च्या दृष्टीकोनातून आकार दिला जातो. SECURE म्हणजे सुरक्षितता, आर्थिक सहकार्य, संपर्काचे जाळे, एकता, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर आणि पर्यावरण संरक्षण असा अर्थ आहे. डॉ. एस जयशंकर यांनी शिखर परिषदेच्या अनुषंगाने संयुक्त

राष्ट्र महासचिव अँटोनियो गुटेरस आणि कझाकस्तान, रशिया, बेलारूस, उझबेकिस्तान आणि ताजिकिस्तानमधील समपदस्थांची भेट घेतली. अस्तानातील पुष्किन पार्कमधील महात्मा गांधींच्या पुतळ्यालाही त्यांनी आदरांजली वाहिली.

**झिका विषाणू**

पुणे शहरातील डहाणूकर कॉलनीमध्ये झिका विषाणूचा संसर्ग झालेला सातवा रुग्ण आढळला आहे. 45 वर्षीय महिलेला झिका विषाणूचा संसर्ग झाल्याचा अहवाल प्रयोगशाळेनं दिला असून तिला संसर्गाची  सौम्य लक्षणं  आहेत. यापूर्वी निदान झालेल्या पाच महिलांपैकी दोन गर्भवती असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागानं दिली आहे. राज्यात झिका विषाणू संसर्गाचे रुग्ण आढळल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रिय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं सर्व राज्यांना मार्गदर्शक सूचना पाठवल्या आहेत.

**LS-नियम**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीशी संबंधित नियमांमध्ये सुधारणा केली आहे. यामध्ये निवडून आलेल्या सदस्यांना शपथेनंतर घोषणाबाजीसह कोणतीही टिप्पणी जोडण्यापासून प्रतिबंध घालण्यात आला आहे. ताज्या सुधारणांनुसार, 'सभापतींचे निर्देश' यामध्ये नवीन कलम समाविष्ट करण्यात आले आहे. सदस्याने भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या अनुसूचीमध्ये, उद्देशासाठी नमूद केलेल्या स्वरुपाच्या अनुषंगाने, यथास्थिती, शपथ किंवा प्रतिज्ञा घेणे आवश्यक आहे आणि तो कोणताही शब्द किंवा अभिव्यक्ती वापरणार नाही किंवा शपथ किंवा प्रतिज्ञेच्या स्वरूपात उपसर्ग किंवा प्रत्यय म्हणून कोणतीही टिप्पणी करणार नाही. लोकसभेच्या अनेक निर्वाचित सदस्यांनी शपथ घेतल्यानंतर आणि अनेक सदस्यांनी आक्षेप घेतलेल्या टिप्पणी केल्यानंतर काही दिवसांनी हा नियम करण्यात आला आहे.

**EC-महा विधानसभा निवडणुका**

महाराष्ट्रात, आगामी राज्य विधानसभा निवडणुकांच्या आधी, निवडणूक आयोगानं मतदार याद्यांची विशेष सारांश उजळणी जाहीर केली आहे. याअंतर्गत, मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रं स्थापन करण्यावर निवडणूक आयोगाचा भर राहील. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष आणि सचिवांना बूथ-स्तरीय स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येईल. या स्वयंसेवकांना पात्र मतदारांची नावे अद्ययावत करण्याचे आणि सोसायटी सोडून गेलेल्या किंवा सोसायटीतील मृत व्यक्तींची नावे काढून टाकण्याचे काम दिले जाईल. गृहनिर्माम सोसायटीमध्ये बूथ स्थापन करण्यासाठी, सोसायटीने जवळच्या बूथ स्तरीय अधिकाऱ्याशी संपर्क साधणे आवश्यक आहे. सोसायटी Google फॉर्मद्वारे निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज देखील सादर करू शकते.  मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी गृहनिर्माण सोसायट्यांना मतदारांसाठी सोयीस्कर आणि जवळच्या ठिकाणी मतदान केंद्र स्थापन करण्यासाठी पावलं उचलण्याचं आवाहन केलं आहे.

**5 जी**

भारताने 96 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याच्या 5G लहरींचा नवीन  लिलाव कालपासून सुरू केला. या लिलावात 8 बँड असून प्रमुख दूरसंचार कंपन्या  5G मोबाइल सेवांसाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या रेडिओ लहरी मिळवण्यासाठी लिलावात सहभागी होतील. ऑगस्ट 2022 मध्ये झालेल्या स्पेक्ट्रम लिलावात सरकारला विक्रमी दीड लाख कोटी रुपये मिळाले होते. सरकारने जुलै 2022 मधल्या पहिल्या  5G स्पेक्ट्रम लिलावातल्या  72 गिगाहर्ट्झपेक्षा कमी म्हणजे 10 पूर्णांक 5 गीगाहर्ट्झ - 5G लहरी यंदाच्या लिलावात विक्रीसाठी खुल्या केल्या आहेत.

**सागरी विद्यापीठ**

देशातलं पहिलं सागरी विद्यापीठ महाराष्ट्रात रत्नागिरी इथं उभारण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मंजुरी दिल्याची माहिती रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी काल दूरस्थ पद्धतीने घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. रत्नागिरीत शासकीय विधी महाविद्यालय उभारण्यासही त्यांनी मंजुरी दिल्याचं सामंत म्हणाले. काही महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री जिल्हा दौऱ्यावर आले असताना त्यांच्याकडे या दोन्हींची मागणी करण्यात आली होती. सागरी विद्यापीठाच्या उभारणीसाठी पाचशे ते सहाशे कोटी रुपये, तर शासकीय विधी महाविद्यालयाच्या उभारणीसाठी 25 कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचं सामंत म्हणाले.

**संरक्षण**

लडाखच्या माउंट कांग येतसे-चं दुसरं पर्वतारोहण अभियान यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या राष्ट्रीय छात्र सेना 'एनसीसी'च्या, मुलींच्या आणि मुलांच्या संघाचं - संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी काल नवी दिल्लीत स्वागत केलं. एनसीसी च्या पर्वतारोहण मोहीम संघात 27 मुलं आणि मुली, पाच अधिकारी आणि 17 स्थानिक प्रशिक्षक कर्मचारी यांचा समावेश होता.

**बिहार एमबीबीएस**

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषेमध्ये शिक्षण देण्याचा निर्णय बिहार राज्याच्या आरोग्य विभागाने घेतला आहे. बिहारमधील राज्य सरकारच्या 10 आणि केंद्र सरकारच्या 2 संस्थांसह एकूण 21 वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध होईल.

**अडवाणी**

भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना काल संध्याकाळी नवी दिल्लीतल्या अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अडवाणी यांची प्रकृती स्थिर असून ते डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत असं रूग्णालयाने दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. गेल्या आठवड्यात, वृद्धत्वाशी संबंधित आरोग्य समस्यांमुळे अडवाणी यांना एम्स रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं होतं; मात्र दुसऱ्या दिवशी त्यांना घरी सोडण्यात आलं होतं .

**विंबल्डन**

विम्बल्डन टेनिसमध्ये काल पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीत, भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन सहकारी मॅथ्यू एबडेन यांनी डच जोडी सँडर एरेंड्स आणि रॉबिन हासे यांच्यावर 7-5, 6-4 असा विजय मिळवून आपल्या मोहिमेला सुरुवात केली. मात्र , भारताचा सुमित नागल आणि त्याचा सर्बियन जोडीदार दुसान लाजोविक यांना पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीत पराभव पत्करावा लागला.

**आसाम-पूर**

आसाम राज्यातली पूरस्थिती गंभीर असून 29 जिल्ह्यांमधील 16 लाखांहून अधिक लोक पुराच्या तडाख्यात अडकले आहेत. काल आणखी 8 जणांचा मृत्यू झाल्यामुळे मृतांची संख्या 46 वर पोहोचली आहे, तर आणखी 3 जण बेपत्ता आहेत. राज्यभरातील 105 महसूल मंडळातील एकूण 2800 गावं पुरामुळे बाधित झाली असून 39 हजार 400 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं नुकसान झालं आहे. पुरामुळे जागतिक वारसा स्थळ असलेल्या काझीरंगा राष्ट्रीय उद्यानातील 178 वन तपासणी नाकी आणि प्राण्यांनी जवळच्या टेकड्यांवर स्थलांतर केलं आहे. प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी उद्यान प्राधिकरणाने वाहतूक वळवण्याचे आदेश दिले असून अवजड व्यावसायिक वाहनांच्या हालचालींवर निर्बंध घालण्यात आले आहेत.ब्रह्मपुत्रा, बराक आणि त्यांच्या सर्व उपनद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत असून बुऱ्हिडीहिंग नदी पुराच्या सर्वोच्च पातळीवरून वाहत आहे.

## **यावरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**